राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.
'STARS' प्रकल्पांतर्गत

# पायाभूत चाचणी २०२३-२४

## इयत्ता - तिसरी : विषय - मराठी (प्रथम भाषा)

## शिक्षकांसाठी सूचना आणि उत्तरसूची

'STARS' प्रकल्पांतर्गत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात राज्यस्तरावरून विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन चाचणी - १ व संकलित मूल्यमापन चाचणी - २ अशा तीन शैक्षणिक प्रगती चाचण्या घेण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने संबधित इयत्तानिहाय अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे किंवा नाही याची पडताळणी या चाचण्यांद्वारे करण्यात येईल. राज्यस्तरावरून २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात सुरुवातीस इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्तींवर आधारित इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी घेण्यात येत आहे. सदर चाचणीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांनी मागील इयत्तेमधील अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त केल्या आहेत हे शिक्षकांनी लक्षात घेऊन गरजेनुरूप कृती-कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे हा आहे.

**चाचणीचे स्वरूप :**

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इयत्तानिहाय व विषयनिहाय अध्ययन निष्पत्तींचे विकसन करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक ही अध्ययन निष्पत्तींच्या आधारे तपासली जाणार आहे. या पुढील काळात होणारी सर्व राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणे व राज्य अध्ययन संपादणूक सर्वेक्षणे ही अध्ययन निष्पत्तींवर आधारित असणार आहेत, त्यामुळे पायाभूत चाचणी विकसित करताना मागील इयत्तांच्या विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती विचारात घेतल्या आहेत.

**तोंडी चाचणी घेण्यासाठी सूचना :**

१) तोंडी चाचणीसाठी काही पूरक साहित्य आवश्यकता असल्यास (उदा. शब्द कार्डे, वाक्य कार्डे, चित्रे इ.) असे साहित्य पुरेशा संख्येने चाचणी सुरू करण्यापूर्वी तयार करून ठेवावे.

२) तोंडी चाचणी घेत असताना चित्र निरीक्षण, श्रवण, वाचन इ. कृतींसाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ द्यावा.

३) विद्यार्थ्यांची नेमकी संपादणूक लक्षात येण्यासाठी पारदर्शी व तणावमुक्त वातावरणात चाचणी घेण्यात यावी.

४) वयोगटानुसार विद्यार्थ्यांच्या घरच्या/परिसर भाषेचा स्वीकार करावा.

५) तोंडी प्रश्नांचा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वैयक्तिक स्वरूपात घ्यावा व प्रतिसादानुसार लगेचच प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्राप्त गुणांची नोंद दिलेल्या गुणनोंद तक्त्यात करावी, अर्धा गुण देऊ नये.

**लेखी चाचणी घेण्यासाठी सूचना :**

१) इयत्ता तिसरी व चौथीच्या मुलांसाठी एक एक प्रश्न वाचून दाखवावा, काय करावयाचे आहे, हे समजावून सांगावे व तो प्रश्न सोडवायला सांगावा. याप्रमाणे एक एक प्रश्न पूर्ण करत चाचणी सोडवून घ्यावी.

२) इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना आवश्यकता आहे, त्यांना प्रश्न समजावून सांगावा. मात्र उत्तराचा संकेत देऊ नये.

३) विद्यार्थ्यांची नेमकी संपादणूक लक्षात येण्यासाठी पारदर्शी व तणावमुक्त वातावरणात चाचणी घेण्यात यावी. शाळेच्या मधल्या सुट्टीची वेळ झाल्यास अथवा मुले कंटाळली आहेत असे वाटल्यास थोडा वेळ थांबून नंतर उरलेली चाचणी घेण्यास हरकत नाही.

४) लेखी चाचणीमध्ये उत्तरे लेखनासाठी आवश्यक जागा देण्यात आलेली आहे.

५) संबंधित विषय शिकवणाऱ्या शिक्षकांनी आपल्या वर्गात ही चाचणी घ्यावयाची आहे व ती तपासावयाची आहे.

६) प्रत्येक विद्यार्थ्याची सद्य:स्थितीमध्ये नेमकी संपादणूक कशी आहे, हे पाहणे हा मुख्य उद्देश चाचणी घेण्यामागे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत सदर चाचणी घेण्याबाबतचा निर्णय संबंधित विद्यार्थ्यांचा दिव्यांग प्रकार लक्षात घेऊन शाळा मुख्याध्यापक, शिक्षक यांनी घ्यावा. आवश्यकतेनुसार विशेष तज्ज्ञ किंवा विशेष शिक्षक यांची मदत घ्यावी.

७) प्रात्यक्षिक/तोंडी आणि लेखी चाचणीचा गुणनोंदणी तक्ता चाचणीच्या सुरुवातीला देण्यात आलेला आहे. प्रश्ननिहाय गुणांची नोंद सदर तक्त्यात शिक्षकांनी करावयाची आहे. अर्धा गुण देऊ नये.

८) शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणांचे विश्लेषण करून वर्गस्तरावर गरजेनुरूप कृती–कार्यक्रम तयार करून अंमलबजावणी करावी.

| तोंडी | लेखी | एकूण गुण |
|---|---|---|
| १० | ३० | ४० |

## उत्तरसूची व गुणदानाबाबत सूचना

| तोंडी चाचणी | | | |
|---|---|---|---|
| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती | गुणदान |
| प्र. १) | **तुझे मित्र किंवा मैत्रीण उन्हाळी सुट्टीनंतर तुला पहिल्यांदा शाळेत भेटले, तर तू त्यांना कोणते प्रश्न विचारशील. दोन प्रश्न सांग.** | 02.01.01 | २ |
| | विद्यार्थ्यांना प्रश्न समजावून सांगावा. दोन प्रश्न त्यांनी सांगितले तर २ गुण, एक प्रश्न सांगितला तर १ गुण द्यावा. | | |
| प्र. २) | **कविता ऐक आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 02.01.03 | ३ |
| | शिक्षकांनी दिलेल्या कवितेचे गायन करावे व खालील प्रश्नांची उत्तरे तोंडी विचारावीत. गरजेनुसार विद्यार्थ्यांच्या स्थानिक/बोलीभाषेत प्रश्न समजावून सांगावा व त्याप्रमाणे उत्तरे स्वीकारावीत व त्यानुसार गुणदान करावे.<br>अ) अर्धचंद्र<br>आ) भाजी करणे, पोहण्यासाठी<br>इत्यादी समर्पक उत्तरास प्रत्येकी १ गुण | | <br><br><br>१<br>२ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. ३) | **जाहिरात वाच व उत्तरे सांग.** | 02.01.04 | ५ |
| | विद्यार्थ्यांना जाहिरात दाखवावी व त्यांना निरीक्षणास पुरेसा वेळ द्यावा. त्यानंतर प्रश्नांचा तोंडी प्रतिसाद घ्यावा व त्यानुसार गुणदान करावे.<br>अ) ५ रुपये<br>आ) नाही, कारण नाटक २६ जानेवारी या एकाच दिवसासाठी होते.<br>इ) खारूताई<br>ई) नाही | | <br><br>१<br>२<br>१<br>१ |
| | **लेखी चाचणी** | | |
| प्र. ४) | **सूचनेनुसार कृती कर.** | 02.01.05 | ६ |
| | अ) 'ळी' ने शेवट असणारे शब्द स्वीकारावेत.<br>आ) शब्दसाखळी योग्यरीत्या पूर्ण केल्यास २-३ शब्दांपर्यंत १ गुण व ४ किंवा त्यापेक्षा जास्त शब्द लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>इ) १) संध्याकाळ  २) जिलेबी (प्रत्येकी १ गुण) | | २<br>२<br><br>२ |
| प्र. ५) | | 02.01.07 | ४ |
| | अ) खालील उतारा वाच व त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.<br>१) उन्हाळा<br>२) पाणी शोधण्यासाठी ती खूप फिरली. ✓<br>३) पशू-पक्ष्यांना जगण्यासाठी पाण्याची गरज नसते. ✗<br>४) समर्पक उत्तर स्वीकारावे. (विद्यार्थ्यांच्या स्व-भाषेचा स्वीकार करावा.)<br>आ) दीपाताई या बसवाहक (कंडक्टर) आहेत. त्यांच्या कामाविषयी माहिती घेण्यासाठी त्यांना तू कोणते प्रश्न विचारशील? दोन प्रश्न लिही. | | <br>१<br>१<br>१<br>१<br><br>२ |
| | प्रश्न रचनेप्रमाणे तपासून घ्यावेत. प्रत्येकी १ गुण याप्रमाणे कमाल २ गुण द्यावेत. | | |
| प्र. ६) | **खालील चित्राचे निरीक्षण कर व त्याविषयी तुझ्या शब्दांत ३-४ वाक्ये लिही.** | 02.01.08 | ३ |
| | वाक्यरचनेनुसार, किमान ३-४ वाक्ये लिहिल्यास पूर्ण ३ गुण द्यावेत. (मुलांची बोलीभाषा/परिसर भाषेचा स्वीकार करावा.)<br>• दोन वाक्ये लिहिल्यास<br>• एक वाक्य लिहिल्यास | | <br><br>२<br>१ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. ७) | **खाली दिलेली वाक्ये वाच व कृतीचा योग्य क्रम दर्शविणारा अंक चौकटीत लिही.** | 02.01.09 | ४ |
| | योग्य क्रम [४] , [१] , [३] , [२] याप्रमाणे प्रत्येक अचूक क्रमांकाला १ गुण द्यावा. | | |
| प्र. ८) | **खालील कविता वाच व प्रश्नांच्या योग्य उत्तराला गोल कर.** | 02.01.10 | ३ |
| | अ) जंगलात<br>आ) ससा<br>इ) जमीन | | १<br>१<br>१ |
| प्र. ९) | **खालील चित्रात काय काय दिसते, त्याविषयी तुला काय वाटते, ते ३-४ वाक्यांत लिही.** | 02.01.14 | ४ |
| | योग्य वाक्यरचनेनुसार किमान ४ वाक्ये लिहिल्यास पूर्ण गुण द्यावेत.<br>योग्य वाक्यरचनेनुसार ३ वाक्ये लिहिल्यास ३ गुण द्यावेत.<br>योग्य वाक्यरचनेनुसार २ वाक्ये लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>योग्य वाक्यरचनेनुसार १ वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा. | | |
| प्र. १०) | **खालील ओळी वाच व पुढे काय घडले असेल, ते तुझ्या कल्पनेने ३-४ वाक्यांत लिही.** | 02.01.15 | ४ |
| | योग्य वाक्यरचनेनुसार किमान ४ वाक्ये लिहिल्यास पूर्ण गुण द्यावेत.<br>योग्य वाक्यरचनेनुसार ३ वाक्ये लिहिल्यास ३ गुण द्यावेत.<br>योग्य वाक्यरचनेनुसार २ वाक्ये लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>योग्य वाक्यरचनेनुसार १ वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा. | | |

■■■